**ग्रामीण/नागरी पाणी पुरवठा योजनांना**
**प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक : ग्रापापु-१०९६/प्र.क्र.१२५६/पापु-०७.**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक : १३ ऑगस्ट, १९९७.**

**पहा :-** १) शासन निर्णय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापापु १०९०/प्र.क्र.१२५६/पापु ०७, दिनांक ११ ऑक्टोबर १९९६.
२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई यांचे पत्र क्र. मजीप्रा/ मनीसंवसकक्ष२ अअ/३६० दिनांक ५ मे,१९९७.

**प्रस्तावना :-**

पाणी पुरवठा योजनेच्या कामांना गती मिळावी यासाठी संदर्भात नमूद केलेल्या दिनांक ११.१०.१९९६ च्या शासन निर्णयान्वये विविध स्तरावरील अधिकाऱ्यांना तांत्रिक मंजूरी, प्रशासकीय मंजूरी व निविदा मंजूरी बाबतचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. सदर अधिकारांपैकी प्रशासकीय मान्यतेचे अधिकार हे ग्रामीण पाणी पुरवठा योजनेबाबतच मर्यादित आहेत की ते नागरी पाणी पुरवठा योजनांनाही लागू आहेत याबाबत संदिग्धता असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे व या संदर्भामध्ये स्पष्ट निर्देश देण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

**परिपत्रक :-**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या विचारणेच्या संदर्भात असे नमूद करण्यात येते की, संदर्भाधीन दिनांक ११ ऑक्टोबर १९९६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४(ब) मध्ये नमूद करण्यात आलेले प्रशासकीय मान्यतेचे अधिकार हे ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाशी संबंधीत असून जिल्हयाच्या ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या कृती आराखडयास जिल्हा पाणी पुरवठा समितीच्या मान्यता घेतल्यानंतरच अंमलात आणावयाचे आहेत. जिल्हा पाणी पुरवठा समितीने जिल्हयाच्या ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या कृती आराखडयास मान्यता दिल्यानंतर रु. १५ लाखापर्यंतच्या म्हणजेच स्थानिक स्तरीय नळ पाणी पुरवठा योजनांना जिल्हा परिषदे मान्य द्यावयाची असून रु. १५ लाखापेक्षा जास्त किंमतीच्या नळ पाणी पुरवठा योजनानां म्हणजेच राज्यस्तरीय योजनांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यकारी अभियंता/ अधिक्षक अभियंता अथवा मुख्य अभियंता यांनी त्यांना प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय मर्यादेपर्यंत प्रशासकीय मान्यता द्यावयाची आहे. रु. १०० लाखापेक्षा जास्त किंमतीच्या ग्रामीण

पाणी पुरवठा योंजनाना शासनाकडून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येईल. नागरी भागातील सर्व नळ पाणी पुरवठा योजनांचा प्रचलित पध्दतीप्रमाणे शासन स्तरावरुन प्रशासकीय मान्यता दिली जाईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**(रु. न. देशमुख)**
**उप सचिव**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.**

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त.
२. सर्व जिल्हाधिकारी.
३. सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
४. संचालक , भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, स्वार गेट पुणे.
५. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण एक्सप्रेस टॉवर्स, ४ था मजला, नरिमन पॉईट, मुंबई ४०० ०२१.
६. सर्व विभागीय मुख्य अभियंता
७. सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
८. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सर्व कार्यकारी अभियंता.
९. सर्व जिल्हा परिषदांच्या लघुपाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता.
१०. सर्व जिल्हा परिषदांच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता.
११. सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा.
१२. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व अधिकारी/उपसचिव.
१३. निवडनस्ती. पापु-०७.